# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 24/12/2021 (शुक्रवार)
(दुपार)

---

### विनयभंग

पो.स्टे. काटोल :– वय 35 वर्ष फिर्यादी/पीडिता हिचे पती व आरोपी नामे– चंद्रशेखर विठ्ठलराव काळे रा. रिधोरा ता. काटोल यांचे शेतीबाबत वाद असल्याने ते एकमेकांशी बोलत नाही. दिनांक 23/12/2021 चे 05.30 वा. दरम्यान फिर्यादी हि आंगण झाडत असता आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 354 (ए)(1)(जे)(एच) भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ लता आगरकर मो.नं. 9922787943 हे करीत आहे.

### अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 09 कि.मी. अंतरावरील मौजा जुनापाणी शिवार एन एच 53 येथे दिनांक 23/12/2021 चे 18:10 वा. दरम्यान धनराज गजानन हिंगवे(जखमी), वय 33 वर्ष, रा. उमरी ता. कारंजा गाडगे जि. वर्धा हे आपली एमएच– 32/टी– 6859 क्रमांकाच्या बजाज प्लाटीना मोटरसायकलने त्यांची पत्नी सौ. दिपाली धनराज हिंगवे, वय 23 वर्ष, रा. उमरी ता. कारंजा गाडगे जि. वर्धा व मुलगा शौर्य धनराज हिंगवे, वय दिड वर्ष असे मिळून जुनापाणी गावाकडून कारंजा कडे जात होते. त्यादरम्यान मागून येणा–या वैगनार गाडी क्र. एम.एच– 30/पी– 1432 च्या चालक आरोपी नामे– मनोज नामदेवराव रबडे, वय 31 वर्ष, रा. चंदनपारडी ता. काटोल याने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजिपणे चालवून मोटरसायकला मागुन धडक दिली. या अपघातात मोटरसायकलचा चालक व मुलगा हे गंभीर जखमी झाले व त्यांची पत्नी अपघातामध्ये जागीच मरण पावली. तसेच सदर वैगनर गाडी चा चालक हे घटनास्थळावर न थांबता आपली गाडी सोडून तेथून पळून गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– ज्ञानेश्वर विठ्ठलराव कडवे वय 51 वर्ष, रा. जुनापाणी ता काटोल जि नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184,134/177 कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक राम ढगे मो.नं. 9518979499 हे करीत आहे.

2) पो.स्टे. रामटेक – अंतर्गत 13 कि.मी. अंतरावरील काचुरवाही ते रामटेक रोडवरील मोहारे यांचे राईसमील जवळ रामटेक येथे दिनांक 16/12/2021 चे 13:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– श्रीकांत वसंतराव बावणकुळे, वय 39 वर्ष रा. काचुरवाही हे कारने जात असतांना त्यांना मोहारे याचे राईस मील जवळीला रस्त्यावरील उतारावर विना चालकाचा एम.एच– 40/ए.एम– 2360 क्रमांकाचा ट्रॅक्टरचा चालक जातांना दिसला जवळ जाउन पाहीले असता ट्रॅक्टर चालक आरोपी/मृतक नामे– परसराम शंकर गोल्हर वय 47 वर्ष रा. काचुरवाही यांच्या पोटावरून ट्रॅक्टर गेलेले दिसले. तो आपल्या ट्रॅक्टर मध्ये बसत असतांना त्याचा पाय घसरून तो खाली पडल्यामुळे त्याच्या पोटावरून ट्रॅक्टर गेला. उपचारा दरम्यान त्याचा मृत्यु झाला. अशा फिर्यादिचे रिपोर्ट वरून व पोस्टे धंतोली येथुन प्राप्त कागदपत्रावरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134, 177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार सुरेश धुर्वे मो. नं. 9922935878 हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 11 कि.मी. अंतरावरील मौजा सकरला येथे दिनांक 23/12/21 चे 06.00 वा. ते 06.30 वा. सुमारास बालचंद रामचंद चौरीवाल, वय 35 वर्ष, रा. सकरला हा दारूपिण्याचे सवयीचा असल्यामुळे त्याने दारूच्या नशेत आंब्याच्या झाडाला गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– जयचंद उदाराम चौरीवाल, वय 48 वर्ष, रा. सकरला यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. पारशिवनी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार ज्ञानेश्वर चिमुरकर हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर